## प्रकरण पाच

## निष्कर्ष व शिफारशी

५.१ प्रस्तावना

५.२ इतिहास शिक्षक व शाळा याबाबतचे निष्कर्ष व शिफारशी

५.३ अभ्यासक्रमाबाबतचे निष्कर्ष व शिफारशी

५.४ अध्यापनविषयक निष्कर्ष व शिफारशी

५.५ ऐतिहासिक संबोधविषयक निष्कर्ष व शिफारशी

५.६ ऐतिहासिक मूल्यांबाबतचे निष्कर्ष व शिफारशी

५.७ सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी

५.८ पुढील संशोधनासाठी विषय

## ५.१ प्रस्तावना :

प्रकरण क्रमांक चारमध्ये इतिहास अध्यापक प्रश्नावली व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांच्या मुलाखतीद्वारे प्राप्त झालेल्या प्रस्तुत संशोधन विषयक साधनसामुग्रीचे विश्लेषण, वर्गीकरण केले असून अन्वयार्थ लावला आहे. प्रस्तुत प्रकरणात त्यावर आधारित निष्कर्ष व शिफारशी केल्या आहेत. पुढील संशोधनासाठी काही विषय सुचविण्यात आले आहेत.

## ५.२ इतिहास अध्यापक व शाळा याबाबतचे निष्कर्ष आणि शिफारशी :

१) सारणी क्र. १ वरून असा निष्कर्ष निघतो की, इ. ९ वी ला इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या एकूण २५ अध्यापकांपैकी १७ अध्यापक इतिहास विषयाचे पदवीधर आहेत आणि ८ अध्यापक दुय्यम विषयाचे पदवीधर आहेत. १४ अध्यापक पदव्युत्तर पदवी प्राप्त आहेत. त्यातील १० अध्यापकांचा पदव्युत्तर पातळीवर इतिहास विषय आहे तर ४ अध्यापक दुय्यम विषयाचे पदव्युत्तर आहेत.

याचा अर्थ असा होतो की, ८ अध्यापक दुय्यम विषयाचे पदवीधर असूनही इतिहास विषयाचे अध्यापन करीत आहेत. याबाबत अशी शिफारस करावीशी वाटते की, इतिहास विषयासाठी निवड करावयाच्या अध्यापकांसाठी शैक्षणिक अर्हतेविषयी कोणत्याही प्रकारची सवलत न देता काटेकोरपणाने खात्री करूनच नेमणूक करावी. इतिहास विषयाचे अध्यापन करणारा अध्यापक इतिहास विषयाचाच पदवीधर असावा. इ.९ वीसाठी किंवा त्यापेक्षा उच्च वर्गाला अध्यापन करणारे अध्यापक पदवीला व पदव्युत्तर पातळीवर इतिहासाचे अध्ययन केलेले व शिक्षणशास्त्र पदवीला इतिहास एक विशेष पद्धती घेतलेले असावेत. अध्यापकांचे विषयज्ञानावर जर प्रभुत्व असेल तर अध्यापनही प्रभावी होते.

२) सारणी क्र. ४.२ वरून असा निष्कर्ष निघतो की, इ. ९ वीला इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या सर्वच अध्यापकांनी व्यावसायिक प्रशिक्षण (बी.एड्.) घेतलेले आहे. मात्र एकूण २५ इतिहास अध्यापकांपैकी ५ अध्यापकांनी व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण करताना इतिहास विशेष अध्यापन पध्दतीची निवड केलेली नाही. व्यावसायिक पातळीवरील पदव्युत्तर (एम.एड्.) शिक्षण २५ अध्यापकांपैकी एका अध्यापकाने पूर्ण केले आहे.

याबाबत असे म्हणता येईल की, प्रस्तुत संशोधनांतर्गत इतिहास अध्यापकांनी माध्यमिक शाळेत अध्यापन करण्यासाठी आवश्यक असलेली किमान शैक्षणिक अर्हता धारण केलेली आहे. मात्र २५ पैकी ५ अध्यापकांनी व्यावसायिक पदवी पातळीवर (बी.एड्.) इतिहास विशेष अध्यापन पध्दती निवडलेली नाही असे असूनही हे अध्यापक इतिहास विषयाचे अध्यापन करतात. याबाबत सुचवावेसे वाटते की, पदवीला इतिहास व व्यावसायिक पदवीला इतिहास विशेष अध्यापन पध्दतींचे अध्ययन केले असेल अशाच अध्यापकांना अध्यापन करण्यासाठी इतिहास विषय द्यावा. तसेच इ. ९ वीच्या इतिहासाच्या पाठयपुस्तकाची रचना अध्यापकाच्या विवेचनाला वाव देणारी असल्याने इतिहास अध्यापक व्यासंगी व अधिक शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण केलेला असावा.

३) सारणी क्र.४.३ (इतिहास अध्यापकांचा अध्यापन अनुभव) वरून असा निष्कर्ष निघतो की, १ ते ५ वर्षांपर्यन्त इ. ९ वीला इतिहास अध्यापन करण्याचा अनुभव असलेली अध्यापक संख्या ३ आहे तर ११ वर्षांपेक्षा अधिक अनुभव असणाऱ्या अध्यापकांची संख्या १८ आहे.

इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्यापन करीत असलेल्या अध्यापकांच्या अनुभवावरून असे दिसते की, त्यांना इ. ९ वीवर इतिहासाचे अध्यापन करण्याचा अनुभव अधिक आहे. ही समाधानकारक बाब आहे.

४) सारणी क्र. ४.४ वरून असा निष्कर्ष निघतो की, इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या २५ अध्यापकांपैकी केवळ ४ अध्यापक म्हणजेच १६ टक्के अध्यापक विषयाशी संबंधित अंक, ऐतिहासिक त्रैमासिके मागवितात. २१ अध्यापक अशाप्रकारचे साहित्य स्वत: मागवित नाहीत.

याबाबत अशी शिफारस करता येईल की, इतिहास अध्यापकांची विषयाबाबतची अभिरूची व व्यासंग वाढविण्याची गरज आहे. त्यासाठी विषयातील तज्ज्ञ, अनुभवी जाणकार अशा व्यक्तींकडून अध्यापकांचे प्रबोधन करावे. हे कार्य इतिहास मंडळे, ऐतिहासिक परिषदा, कृतिसत्रे, सेमिनार यांचे आयोजन करून करावे. त्याचप्रमाणे इतिहास अध्यापकांचा व्यासंग वाढविण्या-साठी विविध मासिके, त्रैमासिके, पाक्षिके, वृत्तपत्रे शाळेत उपलब्ध करून द्यावीत. त्यांची उपलब्धता करण्यासाठी शासनाने, संस्थेने निधी उपलब्ध करावा. इतिहासाचा अध्यापक व्यासंगी असेल तरच विषयज्ञानदृष्टया तो परिपूर्ण बनेल. विषयज्ञानाच्यादृष्टीने परिपूर्ण असणारा अध्यापकच प्रभावी व परिणामकारक अध्यापन करू शकेल.

५) सारणी क्रमांक ४.५ वरून असा निष्कर्ष निघतो की, इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकांना मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित, भूगोल या विषयांचेही अध्यापन करावे लागते. यामुळे इतिहास विषयात अध्यापकाला अभिरूची निर्माण होत नाही. अध्यापनासाठी विषय देतांना व्यवस्थापकीय सोय पाहिली जाते.

याबाबत अशी शिफारस करता येईल की, इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाला अधिकाधिक इतिहास अध्यापनाचाच कार्यभार द्यावा. किमान ८ वी व ९ वी व १० वी या वर्गांवर अध्यापन करणाऱ्या अध्यापकांना इतर विषयांचे अध्यापन कार्य न देता केवळ इतिहास अध्यापनाचे कार्य द्यावे.

६) सारणी क्रमांक ४.६ (अध्यापकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबत) वरून असा निष्कर्ष निघतो की, इतिहास विषयाबाबतच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाची गरज ११ अध्यापकांनी म्हणजेच ४४ टक्के अध्यापकांनी प्रतिपादन केली आहे व १४ अध्यापकांनी अशा प्रशिक्षणाची गरज नाही असे नमूद केले आहे.

याचा अर्थ असा होतो की, १४ अध्यापकांना म्हणजे संशोधनांतर्गत ५६ टक्के अध्यापकांना सेवांतर्गत प्रशिक्षणाचे महत्व पटलेले दिसत नाही. याबाबत अशी शिफारस करता येईल की, इतिहास अध्यापकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय तालुका, जिल्हा पातळीवर करावी. इतिहास हा विषय गतिमान आहे याची जाणीव अशा प्रशिक्षणातून करून द्यावी. सेवांतर्गत प्रशिक्षणात अध्यापनातील नवीन तंत्रे प्रात्यक्षिके यावर भर दिला जावा. मुख्याध्यापकांनी इतिहास विषयाचे महत्व व इतिहास विषयाची नवीन संकल्पना लक्षात घेऊन इतिहास अध्यापकांना अशा सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठवावे.

७) सारणी क्रमांक ४.७ वरून असा निष्कर्ष निघतो की, इतिहास विषयक संदर्भ ग्रंथ ७२ टक्के अध्यापकांच्या मते शाळांतून उपलब्ध आहेत तर २८ टक्के अध्यापकांच्या मते शाळांतून पुरेसे संदर्भ ग्रंथ नाहीत.

संदर्भ ग्रंथांच्या उपलब्धतेबाबतची अध्यापकांनी दर्शविलेली स्थिती बऱ्याचशी समाधानकारक दिसते. तरी या संदर्भात अशी शिफारस करता येईल की, जरी ऐतिहासिक संदर्भ ग्रंथांची उपलब्धता असली तरी वर्तमानकाळातील घटनांचा अन्वयार्थ भूतकाळातील अनुभवावर मांडणारी पुस्तके कमी आढळतात अशा पुस्तकांची सोय संस्थेने व शासनाने करावी.

८) सारणी क्रमांक ४.८ वरून निष्कर्ष निघतो की, इतिहास अध्यापकांना शाळांतून ऐतिहासिक उपक्रम राबविण्यास ९२ टक्के अध्यापकांच्या मते सहकार्य मिळते.

याबाबत अशी शिफारस करता येईल की, ऐतिहासिक उपक्रम राबविण्यासाठी शालेय सहकार्य मिळण्यामध्ये अनुकूलता ब-याच प्रमाणात आढळते. या अनुकूल स्थितीचा इतिहास अध्यापकांनी लाभ उठवावा. जास्तीतजास्त ऐतिहासिक उपक्रम शाळेत राबवावेत त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहास विषया-बाबतची अभिरूची वाढेल व अभिरूची निर्माण झाल्याने मुलांचे या विषयाचे अध्ययन चांगले होईल.

संशोधनांतर्गत एकाही माध्यमिक शाळेत इतिहास मंदिराची सोय नाही. याबाबत अशी शिफारस करता येईल की, ऐतिहासिक वातावरण निर्मितीसाठी इतिहासाच्या स्वतंत्र खोलीची गरज आहे. शासनाने प्रत्येक शाळेला इतिहास मंदिर उपलब्ध करून देण्यासाठी अनुदान द्यावे. मुख्याध्यापकांनी केवळ शासकीय मदतीवर विसंबून न रहाता माजी विद्यार्थ्यांशी, पालकांशी संपर्क साधून, सहकारी अध्यापकांच्या सहाय्याने फंड उभारून इतिहास मंदिर उभारावे व इतिहास अध्यापकाने ते सुसज्ज करावे.

९) सारणी क्रमांक ४.९ वरून असा निष्कर्ष निघतो की, ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्यासाठी १०० टक्के शाळा सहलींचे आयोजन करतात. मात्र केवळ २० टक्के अध्यापकांच्या मते राज्या बाहेरील स्थळांना भेटी दिल्या जातात. सर्व संशोधनांतर्गत शाळांमधून राष्ट्रीय दिन साजरे केले जातात. ५० टक्के अध्यापकांच्या मते शाळेत थोर पुरूषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या सा-या केल्या जातात. त्यासाठी वक्तृत्वस्पर्धा, निबंध स्पर्धा व व्याख्याने यांचे आयोजन केले जाते.

ऐतिहासिक सहलींबाबत अशी शिफारस करता येईल की, इतिहासातून राष्ट्रीय एकात्मता हे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी राज्याबाहेरही सहली आयोजित कराव्यात. राज्याबाहेरील सहली कमी खर्चात आयोजित करण्यासाठी राज्य परिवहन मंडळ व शासन जी मदत देते त्याचा फायदा घ्यावा. ऐतिहासिक

स्थळांमध्ये विविधता असावी. केवळ ऐतिहासिक स्थळाला भेट देऊन कार्यभार न आरोपता ऐतिहासिक स्थळ तेथील भौगोलिक,प्रादेशिक माहिती, सांस्कृतिक, राजकीय जीवन इत्यादींचा परामर्श घ्यावा. सहलीहून आल्यावर सहलीतील अनुभव, माहिती यावर आधारित विद्यार्थ्यांकडून प्रकल्प तयार करून घ्यावा.

थोर व्यक्तींच्या जयंत्या, पुण्यतिथ्या व राष्ट्रीय दिन हे उपक्रम जाणीवपूर्वक विशिष्ट हेतू साध्य करण्याच्या उद्देशाने राबविले जावेत. हे कार्यक्रम राबविताना स्थानिक लोक, पालक यांचाही सहभाग असावा.या दिवशी केवळ व्याख्याने न देता एखादा सक्रीय कार्यक्रम हाती घ्यावा. ज्या व्यक्तीची जयंती अथवा पुण्यतिथी आहे त्यांचे पुण्यस्मरण हे त्या दिवशीच्या उपक्रमांमधून सातत्याने व्हावे.

५.३ <u>अभ्यासक्रमाबाबतचे निष्कर्ष व शिफारशी</u> :

१) सारणी क्र. ४.१० वरून असा निष्कर्ष निघतो की, इ. ९ वीच्या इतिहास विषयाच्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यानी तयार केलेल्या अध्यापन पुस्तिकेतील उद्दिष्टांचा त्यांच्या महत्त्वांशानुसार दिलेला अनुक्रम व त्याच उद्दिष्टांना इतिहास अध्यापकांनी महत्त्वांशानुसार दिलेला अनुक्रम यात तफावत आहे असे आढळते. तसेच अध्यापन पुस्तिकेत नमूद केलेल्या उद्दिष्टां व्यतिरिक्त नैतिक दर्जा वाढविणे, चारित्र्य संपन्न नागरिक बनविणे अशा उद्दिष्टांचा ८० टक्के अध्यापकांनी उल्लेख केला आहे.

इतिहास अध्यापनाच्या उद्दिष्टांबाबत अशी शिफारस करता येईल की, अध्यापन उद्दिष्टांच्या महत्त्वांशाबाबत एकमत असणे आवश्यक आहे. त्यासाठी इतिहास तज्ज्ञांनी कृतीसत्रांमधून, सेमिनारमधून इ. ९ वीचा इतिहासाचा अभ्यासक्रम व इतिहास अध्यापनाची उद्दिष्टे याबाबत इतिहास अध्यापकांना

त्यांच्याशी चर्चा करून मार्गदर्शन करावे. हे एकूण इतिहास अध्यापनाचा हेतू लक्षात घेता आवश्यक आहे.

चारित्र्यसंपन्न नागरिक तयार करणे ही आजच्या काळातील महत्वाची गरज आहे ती केवळ इतिहास अध्यापनानेच पूर्ण होऊ शकते. परंतु या उद्दिष्टाचा स्पष्ट उल्लेख इतिहास अध्यापन पुस्तिकेत दिलेल्या उद्दिष्टांत केलेला नाही. नवीन शैक्षणिक धोरणाचा रोख चारित्र्य संपन्न नागरिक घडविणे हा असल्याने या उद्दिष्टांचा अंतर्भाव करावा.

२) सारणी क्रमांक ४.११ वरून असा निष्कर्ष निघतो की, इतिहासाच्या अभ्यासक्रमातून सर्वसामान्य उद्दिष्टांची पूर्ती होते असे २४ अध्यापकांनी म्हणजेच ९६ टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे. जरी अध्यापकांनी असे नमूद केले असले तरी उद्दिष्टांच्या पूर्तीबाबत नेमके उत्तर देणे अवघड आहे. कारण याचे नेमके उत्तर विद्यार्थ्यांच्या वर्तनातूनच शोधावे लागते. त्यासाठी विशिष्ट प्रकारच्या वर्तनबदल मोजण्यासाठीच्या कसोटया उपलब्ध होण्याची गरज आहे. अशा कसोटया विद्यापीठ शिक्षणशास्त्र विभाग व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी तयार कराव्यात. त्यासाठी संस्था व शासन यांचे सहकार्य घ्यावे.

३) सारणी क्र. ४.१२ व ४.१३ यावरून असे निष्कर्ष निघतात की, इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्यापन करणारे अध्यापक व तज्ज्ञ अधिव्याख्याते यांच्या मतानुसार इ. ९ वीचा निर्धारित केलेला इतिहास विषयाचा अभ्यासक्रम बहुतांशाने योग्य आहे. तरीही प्रकरण क्र. २ व ३ आणि प्रकरण क्र. ४ व ५ यांचे एकत्रीकरण करावे असे ७ अध्यापकांनी म्हणजे २८ टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे.

इतिहास अभ्यासक्रमाची उद्दिष्टे व त्यानुसार विषयांशाची केलेली मांडणी पुरेशी व योग्य आहे असे संशोधनांतर्गत बहुतांशी अध्यापकांचे मत

असले तरी सुध्दा खालील घटकांचा बदल पाठयपुस्तकात करणे आवश्यक आहे.

अ) फ्रेंच राज्यक्रांती भाग १ व भाग २ ऐवजी एकाच घटकात सलगपणे, तर्काधिष्ठित मांडणी करून घ्यावी.

ब) औद्योगिक क्रांती भाग १ व भाग २ यांचेही एकत्रीकरण करून सलगपणे मांडणी करावी.

क) इ. ९ वीच्या विद्यार्थ्यांची आकलनक्षमता विचारात घेऊन समाजवाद या प्रकरणाची मांडणी सोप्या व आकलन योग्य भाषेत करावी. विषयांशाचे तात्विक अवमूल्यन न होता विषय सोप्या व आकलनयोग्य भाषेत मांडावा. गरज भासल्यास तज्ज्ञांकडून त्या प्रकरणांचे पुनर्लेखन करून घ्यावे.

ड) प्रकरण क्र. ९ व १० मधील विषयांशाची मांडणी तर्कसंगत व आकलनयोग्य नाही तेव्हा ती मांडणी सोप्या भाषेत करणे आवश्यक आहे.

बहुतांशी तज्ञ अधिव्याख्यात्यांच्या मते इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमाची मांडणी करताना विद्यार्थी स्वत: शिकू शकतील अशा रितीने करावी.

४) सारणी क्र. ४.१४ वरून असा निष्कर्ष निघतो की, इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमात निवडलेल्या प्रकरणातील विषयांश उद्दिष्टांच्या पूर्तीचा विचार करता बहुतांशाने परिपूर्ण आहे.

उद्दिष्टपूर्तीसाठी जरी विषयांश परिपूर्ण आहे असे बहुसंख्य अध्यापकांचे मत असले तरी प्रस्तुत संशोधनांतर्गत संशोधकाला असे सुचवावेसे वाटते की, विषयज्ञानाला परिपूर्णता आणण्यासाठी विविध अनुभव संदर्भ पुस्तकांच्या माध्यमातून देण्यात येतात. इतिहास अभ्यासक्रमाला पूरक असे संदर्भ ग्रंथांचे लेखन पाश्चात्य राष्ट्रांप्रमाणे आपल्याकडे झालेले नाही. अनुभवी व तज्ज्ञ इतिहास अध्यापकांनी पुढे येऊन हे कार्य करण्याची गरज आहे.

५) सारणी क्र. ४.१५ व ४.१६ वरून असे निष्कर्ष निघतात की, इतिहास विषयाच्या अध्यापनासाठी निश्चित केलेल्या तासिका कमी पडतात असे बहुसंख्य अध्यापकांनी नमूद केले आहे. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी अध्यापक रजेवरील अध्यापकांचे तास घेतात व शाळे दिवशी सकाळी अथवा सायंकाळी जादा तास घेतात.

अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी इतिहास अध्यापक शाळेव्यतिरिक्त वेळेचा उपयोग करतात हे सोयीच्यादृष्टीने योग्य असले तरी व्यवस्थापन, शालेय शिस्त व नियम, पालक व विद्यार्थी यांच्या दृष्टीने योग्य नाही.

इतिहास तज्ज्ञांच्या मते इतिहासाचा अभ्यासक्रम नियोजित वेळेत पूर्ण होऊ शकतो. त्यासाठी इतिहासास तार्किकक्रमाने शिकवावा, अध्यापनात नेमकेपणा असावा व योग्य पध्दतींचा वापर करावा. अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होण्यासाठी सारणी क्र. ४.२१ नुसार दिलेली सोपी प्रकरणे विद्यार्थ्यांना स्वाध्याय पध्दतीने शिकण्यास द्यावीत.

६) सारणी क्र. ४.१७ वरून निष्कर्ष निघतो की, प्रत्येक पाठाची दिलेली उद्दिष्टे बरोबर आहेत असे २५ अध्यापकांनी म्हणजेच १०० टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे. दिलेल्या पाठ्यांश पृथ:करणातील उपघटकांची मांडणी क्रमश: केली आहे असे बहुतांशी अध्यापकांनी नमूद केले आहे. याबाबत असे म्हणता येईल की, इ. ९ वीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमाची घटक, उपघटक यांची मांडणी व त्यानुसार उद्दिष्टे यांमध्ये तर्कसंगती आढळते ही चांगली बाब आहे.

५.४ <u>अध्यापन विषयक निष्कर्ष व शिफारशी</u> :

१) सारणी क्र. ४.१८ वरून असा निष्कर्ष निघतो की, इतिहासाचे अध्यापक कथन पध्दतीचाच मोठया प्रमाणावर वापर करतात. ८८ टक्के अध्यापक

कथन पध्दतीनेच अध्यापन करतात. १०० टक्के तज्ज्ञ अधिव्याख्यात्यांच्या मते इतिहास अध्यापक कथन व पाठ्यपुस्तक पध्दतीनेच अध्यापन करतात. अध्यापक युनिटप्रमाणे पध्दती वापरीत नाहीत. तज्ज्ञांच्या मते दैनंदिन अध्यापनात इतिहास अध्यापक बी.एड्.च्या पध्दतीप्रमाणे अध्यापन करीत नाहीत. तसेच बी.ए. ला इतिहास नसताना प्रशिक्षण महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर त्यांना इतिहास पध्दती दिली जाते. या संदर्भात खालीलप्रमाणे शिफारशी करता येतील.

इतिहास अध्यापकांनी कथन व पाठ्यपुस्तक पध्दतीबरोबर इतिहास अध्यापनाच्या आधार पध्दती, योजना पध्दती, स्वाध्याय पध्दती, नाट्यीकरण पध्दती, प्रश्नोत्तर पध्दती अशा पध्दतींचा युनिटप्रमाणे वापर करावा. इतिहास अध्यापकांना पध्दतींच्या वापरासाठी मार्गदर्शन करण्यासाठी कृतिसत्रे, सेमिनार, चर्चासत्रे इत्यादींचे आयोजन विद्यापीठीय स्तरावर व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून करावे.

इतिहास अध्यापकांनी विषयज्ञान वाढविण्यासाठी संदर्भ पुस्तके वाचावित व विविध पध्दतींचा वापर करून अध्यापनात जीवंतपणा आणावा.

अध्यापन पध्दती आणि अध्यापन कार्यनीती यामधील सूक्ष्म फरक इतिहास अध्यापकाला समजला पाहिजे. तो फरक माहिती नसल्याने इतिहास अध्यापक अध्यापन कार्यनीती प्रभावीरित्या वापरून शकत नाहीत. पाठ्यांशाला अनुसरून योग्य पध्दती व कार्यनीतींचा अवलंब अध्यापकांनी करावा. त्यामुळे निर्धारित वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करणे शक्य होईल. मुख्याध्यापकांनी व पर्यवेक्षकांनी अध्यापक अध्यापनात विविध पध्दती व कार्यनीती वापरतात की नाहीत हे पहावे व त्याला त्यासाठी प्रवृत्त करावे.

१) इतिहास अध्यापकांनी अध्यापनात व्याख्यान, टयुटोरियल्स, प्रश्नोत्तर, उजळणी, सांघीक चर्चा, स्वाध्याय, संशोधन, भूमिका पालन इत्यादी कार्यनीतींचा अवलंब करावा. इतिहास अध्यापकांची कृतिसत्रे घेऊन या कार्यनीतींच्या वापराबाबत अध्यापकांना मार्गदर्शन करावे.

प्रशिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींचा पदवी पातळीवर इतिहास विषय असेल तरच इतिहास विशेष अध्यापन पध्दती द्यावी. पदवी पातळीवर इतिहास नसेल तर अध्यापन प्रभावीरित्या होत नाही. ऐतिहासिक घटनांमधील अन्वयार्थ त्या अध्यापकाला लावता येत नाही.

२) सारणी क्र. ४.१९ वरून असा निष्कर्ष निघतो की, इतिहासाचे अध्यापन करताना सरासरी १६ अध्यापकांनी म्हणजेच ६४ टक्के अध्यापकांनी नकाशाचा वापर केला आहे. चित्रांचा वापर सरासरी १० अध्यापकांनी व तक्त्यांचा वापर ८ अध्यापकांनी केला आहे. या संदर्भात अशी शिफारस करता येईल की, इतिहासात भूतकालीन घटनांचा वर्तमानकालीन स्थितीशी अन्वयार्थ लावून भविष्याबाबतचे काही अंदाज करावयाचे असतात. या दृष्टीने विचार करता ऐतिहासिक घटनांचे चांगले आकलन होण्यासाठी, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया सकस होण्यासाठी इतिहासाचे अध्यापन करताना इतिहास अध्यापकांनी ऐतिहासिक नकाशे, तक्ते, आकृती, कालपट, चित्रे यांचा वापर करून विद्यार्थ्यांना इतिहास विषयात गोडी वाटावी अशी परिस्थिती निर्माण करावी.

इतिहास विषयात वापरण्यास उपयुक्त असे शैक्षणिक साहित्य उपलब्ध होत नाही. ही अडचण ३० टक्के तज्ज्ञ अधिव्याख्यात्यांनी मान्य केली आहे. परंतु ७० टक्के तज्ज्ञांना असे वाटते की, इतिहास अध्यापक शाळेत उपलब्ध असलेल्या साहित्याचाही वापर करीत नाहीत. शैक्षणिक साहित्याच्या वापरामुळे विद्यार्थ्यांचे अध्ययन चांगले होते.

३) सारणी क्र. ४.२०, ४.२१ व ४.२२ वरून असे निष्कर्ष निघतात की, इ. ९ वीचा इतिहासाचा अभ्यासक्रम सरासरी १० अध्यापकांच्या मते सोपा आहे. ११ इतिहास अध्यापकांच्या मते अभ्यासक्रम मध्यम आहे व ४ अध्यापकांच्या मते अभ्यासक्रम कठिण आहे. एकंदरीत विचार करता अभ्यासक्रम सोपा व मध्यम या दोनच श्रेणीत मोडतो आहे.

१, २, ६, ७, ८, ९, १० ही प्रकरणे अध्यापकांनी शिकवावीत असे १०० टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे. प्रकरण क्र. ३, ५, ११ व १२ ही स्वयंअध्ययनास द्यावीत असे बहुतांशी अध्यापकांनी नमूद केले आहे. याबाबतीत खालीलप्रमाणे शिफारशी करता येतील.

इतिहासाच्या अभ्यासक्रमातील प्रकरण क्र. १, २, ६, ७, ८, ९, १० व १३ ही स्वत: अध्यापकांनी शिकवावीत. प्रकरण क्र. ३, ४, ५, ११ व १२ ही प्रकरणे विद्यार्थ्यांना स्वाध्याय पध्दतीने अध्ययन करण्यास द्यावीत. या प्रकरणांच्या अध्यापनासाठीचा निर्धारित वेळ इतर प्रकरणांच्या अध्यापनासाठी वापरावा.

स्वयंअध्ययनासाठी पुढील कार्यनीती सुचविता येतील. दिलेली प्रकरणे विद्यार्थ्यांनी वाचून येणे, अध्यापकाने त्यावर प्रश्न विचारणे, काही प्रमाणात त्यावर लेखन कार्य देणे, प्रश्नोत्तरे लिहून घेणे. सोपा भाग विद्यार्थ्यांना विचारून कठिण भागाचे स्पष्टीकरण करणे.

या सर्व बाबी विचारात घेऊन इतिहास अध्यापकाला अध्यापनाचे नियोजन करावे लागते. नियोजनात अध्ययन-अध्यापनाशी संबंधित असलेल्या कार्यनीतींची रूपरेषा स्पष्ट करावी लागते. परंतु सद्य:स्थितीत कथनासारख्या एकाच पध्दतीवर भर देऊन व शैक्षणिक साधनांचा वापर अभावानेच करून अध्यापन केले जाते. ही अध्यापन-कार्यनीतीतील खरी समस्या आहे. बहुतांशी

शिक्षक कार्यनीती म्हणजे शिकविण्याची पध्दती स्वढाच मर्यादित अर्थ घेतात. परंतु परिणामकारक अध्यापनासाठी पाठ्यांशाचे पृथःक्करण करून पाठ्यांशाला अनुसरून योग्य पध्दती व शैक्षणिक साधनांचा वापर कधी करावयाचा, कोणत्या उपघटकाचे अधिक स्पष्टीकरण करावयाचे, स्वयंअध्ययनास कोणते उपघटक निवडावयाचे, विद्यार्थ्यांना अध्यापनक्रियेत कसे सहभागी करून घ्यायचे या सर्व घटकांचा विचार करून अध्यापन पाठाची विशिष्ट पध्दतीने योजना, आराखडा तयार करणे अत्यंत महत्वाचे असते. या योजनेप्रमाणे केलेले अध्यापन अधिक प्रभावी व परिणामकारक ठरते. संशोधित घटकांच्या आढाव्यावरून कार्यनीतींच्या विकसनास उपयुक्त ठरणारा आराखडा अध्यापकांनी वापरण्याविषयी शिफारस करण्यात येत आहे.

संशोधित घटकांचा आढावा घेऊन इयत्ता ९ वीच्या
इतिहास अध्यापनाबाबत कार्यनीतीचे विकसनास
<u>मार्गदर्शक ठरणारा आराखडा</u>

| पाठ क्रमांक | तासिका | पाठासाठी उपयुक्त अध्यापन पध्दती | पाठासाठी आवश्यक शैक्षणिक साधने |
|---|---|---|---|
| १. | ७ | कथन, चर्चा, आधार | नकाशे, चित्रे,उतारे, वचने |
| २. | ४ | कथन, चर्चा, स्वाध्याय, प्रश्नोत्तर, नाटयीकरण | नकाशे, चित्रे, उतारे, वचने |
| ३. | ४ | कथन, स्वाध्याय,प्रश्नोत्तर | नकाशे, चित्रे, काही उतारे, वचने |
| ४. | ४ | कथन, स्वाध्याय, प्रश्नोत्तर | चित्रे, तक्ते, उतारे, वचने |
| ५. | ३ | कथन, चर्चा, स्वाध्याय, प्रश्नोत्तर | नकाशे, उतारे, वचने |
| ६. | ५ | कथन, प्रश्नोत्तर | चित्रे, तक्ते |
| ७. | ४ | कथन, आधार | चित्रे, तक्ते, उतारे, वचने |
| ८. | ४ | कथन, चर्चा | चित्रे, कालपट, उतारे, तक्ते |
| ९. | ५ | कथन, चर्चा | नकाशे, चित्रे, उतारे, वचने, तक्ते |
| १०. | ४ | कथन, चर्चा, प्रश्नोत्तर | नकाशे, चित्रे, उतारे, तक्ते |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

| पाठ क्रमांक | तासिका | पाठासाठी उपयुक्त अध्यापन पध्दती | पाठासाठी आवश्यक शैक्षणिक साधने |
|---|---|---|---|
| ११. | ४ | कथन, चर्चा, स्वाध्याय, प्रश्नोत्तर, आधार | नकाशे, चित्रे, कालपट, तक्ते, उतारे, वचने |
| १२. | ४ | कथन, चर्चा, स्वाध्याय, प्रश्नोत्तर, आधार | चित्रे, कालपट, उतारे, तक्ते, वचने |
| १३. | ५ | कथन, स्वाध्याय, प्रश्नोत्तरे, नाटयीकरण | नकाशे, चित्रे, तक्ते, वचने, उतारे |

## ५.५ ऐतिहासिक संबोधविषयक निष्कर्ष व शिफारशी :

१) सारणी क्र. ४.२३ वरून असा निष्कर्ष निघतो की, ऐतिहासिक संबोध स्पष्ट करण्यासाठी सरासरी २० अध्यापक म्हणजेच ८० टक्के अध्यापक कथन पध्दतीचा वापर करतात. ७ अध्यापकांनी संबोध स्पष्टीकरणासाठी आधार पध्दतीचा, ११ अध्यापकांनी संबोध स्पष्टीकरणासाठी चर्चा पध्दतीचा व ३ अध्यापकांनी स्वाध्याय पध्दतीचा वापर केला आहे. ९० टक्के तज्ज्ञ अधिव्याख्यात्यांच्या मते ऐतिहासिक संबोध अध्यापकांकडून स्पष्ट केले जात नाहीत.

संबोध स्पष्टीकरणाबाबत अशी शिफारस करता येईल की, संबोध स्पष्ट होणे इतिहास विषयात अत्यावश्यक आहे. कारण त्या त्या इयत्तेतील इतिहास विषयातील संबोध स्पष्ट झाले नाहीत तर पुढील ऐतिहासिक घटनांचे आकलन सुलभरित्या होत नाही. म्हणून इतिहास अध्यापकांनी संबोध स्पष्ट करण्यासाठी कथन, आधार, चर्चा या पध्दतींबरोबर अन्य पध्दतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. कोणतीही एक पध्दती परिपूर्ण असू शकत नाही.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

कोणत्याही पध्दतीतील दोष टाळून त्या पध्दतीतील गुण अधिकाधिक वापरावेत व ते वापरण्याचे कसब इतिहास अध्यापकात असावे. संबोध स्पष्ट करण्यासाठी विविध पध्दतींचा अवलंब करून नाविण्य आणावे.

२) सारणी क्र. ४.२४ वरून असा निष्कर्ष निघतो की, ऐतिहासिक संबोध स्पष्टीकरणासाठी सरासरी १७ अध्यापक म्हणजे ६४ टक्के अध्यापक फळ्याचा वापर करतात. ६ अध्यापक चित्राद्वारे, ६ अध्यापक नकाशाद्वारे तर ३ अध्यापक आकृतीद्वारे संबोध स्पष्ट करतात. याबाबत अशी शिफारस करता येईल की, संबोध स्पष्टीकरणासाठी फळ्याचा वापर यापेक्षा अधिक प्रमाणावर व्हावा, त्याचप्रमाणे चित्रे, आकृती, नकाशे, कालपट इत्यादी साधनांचा वापर इतिहास अध्यापकांनी अधिकाधिक करावा. त्यामुळे विद्यार्थ्यांना सहजतेने संबोध समजतील व त्यांचे अध्ययन चांगले होईल.

३) सारणी क्र. ४.२५ व ४.२६ वरून असे निष्कर्ष निघतात की, संबोध स्पष्ट करण्यासाठी आवश्यक ते शैक्षणिक साहित्य ५२ टक्के अध्यापकांच्या मते शाळेत उपलब्ध नाही. त्यात चित्रे, नकाशे, तक्ते नाहीत असे ४० टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे. आकृत्या व संदर्भ ग्रंथ नाहीत असे २८ टक्के अध्यापकांनी नमूद केले आहे. ८० टक्के पेक्षा अधिक इतिहास अध्यापकांनी नमुने, कालपट, प्रोजेक्टर शाळेत नाहीत असे नमूद केले आहे.

शैक्षणिक साहित्याच्या उपलब्धतेबाबत अशी शिफारस करता येईल की, इतिहास अध्यापकाने दरवर्षी एका इयत्तेसाठीचे आवश्यक ते तक्ते, नकाशे, आकृत्या हे साहित्य चित्रकला शिक्षकाच्या साहाय्याने व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून तयार करून घ्यावे. यासाठी अधिक खर्च येणार नाही याप्रमाणे इतिहास विषयाच्या अध्यापनात उपयुक्त ठरणारे शैक्षणिक साहित्य तीन-चार वर्षांत तयार होईल व इतिहास अध्यापकाला ते दीर्घकाळ वापरता येईल.

तसेच नवीन ऐतिहासिक साधनांच्या निर्मितीमध्ये अनेक व्यापारी संस्था कार्यरत आहेत. अशा व्यापारी संस्थांकडून त्यांच्याकडे उपलब्ध असलेली साधने आणून संबोध स्पष्टीकरणासाठी वापर करावा. ऐतिहासिक कृतिसत्रे सेमिनार यामध्ये उपक्रमशील अध्यापकांनी तयार केलेली साधने व्यापारी तत्वावर तयार करून त्याचा प्रसार सर्व शाळांतून व्हावा.

४) संबोध स्पष्टीकरण करताना इतिहास अध्यापकाने प्रथम तो संबोध स्पष्टपणे उच्चारावा, संबोधाच्या स्वरूपासंबंधी आधुनिक काळात अधिक मान्य झालेली शास्त्रीय परिमाणेने सूत्ररूप रचना करावी. ते सूत्र फळ्यावर लिहावे. सूत्राच्या साहाय्याने संबोधाचे सोदाहरण स्पष्टीकरण करावे. यामुळे विद्यार्थ्यांना संबोध समजणे सोपे जाते.

५) इ. ९ वीच्या इतिहास अध्यापकांचे कृतिसत्र घेऊन इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातील सर्व संबोधाबाबत तज्ज्ञ अध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली ते कसे स्पष्ट करावेत यांचे मार्गदर्शन करावे. इतिहास अध्यापक व तज्ज्ञ यांच्यात संबोध स्पष्टीकरणाबाबत चर्चा झाली तर इतिहास अध्यापकांना संबोध स्पष्टीकरणासाठी त्याचा जास्त उपयोग होईल.

## ५.६ ऐतिहासिक मूल्यांबाबतचे निष्कर्ष व शिफारशी :

१) सारणी क्र. ४.२७ वरून असा निष्कर्ष निघतो की, इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमात वस्तुनिष्ठ भूमिका या मूल्याचा अंतर्भाव सरासरी १६ इतिहास अध्यापकांच्या म्हणजेच ६४ टक्के अध्यापकांच्या मते झाला आहे. या अभ्यासक्रमात राष्ट्रभक्ती हे मूल्य १५ अध्यापकांच्या मते, निकोप राष्ट्रवाद हे मूल्य १० अध्यापकांच्या मते, विश्वबंधुत्व ५ अध्यापकांच्या मते, आंतरराष्ट्रीय सामंजस्य हे मूल्य ३ अध्यापकांच्या मते व भावनात्मक ऐक्य हे मूल्य १३ अध्यापकांच्या मते अंतर्भूत आहे.

मूल्यांबाबत अशी शिफारस करता येईल की, आजच्या जागतिक परिस्थितीचा विचार करून विद्यार्थ्यांमध्ये विश्वबंधुत्वाची भावना व आंतरराष्ट्रीय सामंजस्य ही मूल्ये रूजावित असा इतिहास अध्यापकानी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

२) सारणी क्र. ४.२८ वरून असा निष्कर्ष निघतो की, इतिहासाच्या अध्यापन पुस्तिकेमध्ये नमूद केलेल्या मूल्यांव्यतिरिक्त समता, धर्मनिरपेक्षता, शास्त्रीय दृष्टिकोन, स्वातंत्र्य, नेतृत्व, ध्येयवाद, त्यागवृत्ती इत्यादी मूल्ये इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातून रूजविली जातात. या बाबतीत अशी शिफारस करता येईल की, इतिहास अध्यापकाने ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरण करताना अथवा ऐतिहासिक व्यक्तींचे कार्य स्पष्ट करताना विषयज्ञाना बरोबरच मूल्यांवरसुध्दा अधिक भर द्यावा.

३) इतिहास हा विषय मूल्यशिक्षण देण्यासाठीचा एक क्रमांकाचा महत्वपूर्ण विषय आहे असे १०० टक्के तज्ज्ञ अधिव्याख्यांना वाटते. इतिहासातून विद्यार्थ्यांच्या ठिकाणी मूल्ये रूजविण्यासाठी इतिहास अध्यापक कमी पडतात असे बहुसंख्य तज्ज्ञ अधिव्याख्यात्यांचे मत आहे. याबाबत अशी शिफारस करता येईल की, इतिहास विषय व मूल्यशिक्षण यांचा अतिशय निकटचा संबंध असल्याने इतिहास अध्यापकांनी अध्यापन करताना केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर भर देण्याऐवजी विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये रूजावित असा प्रयत्न करावा.

इतिहास अध्यापकांनी आपल्या स्वत:च्या आचरणातून काही मूल्ये मुलांपुढे आदर्श म्हणून ठेवावीत.

इतिहास अध्यापकांनी ऐतिहासिक घटनांचा सद्य:स्थितीत अर्थ काय आहे व मानव म्हणून आपली कर्तव्ये कोणती आहेत याची विद्यार्थ्यांना जाणीव करून द्यावी.

विद्यार्थ्यांच्या अंगी एखादे मूल्य कितपत बानले आहे हे पाहण्यासाठी कसोटया तयार करणे, मूल्यनिरीक्षण व नोंदी ठेवणे इत्यादी बाबतीत इतिहास अध्यापकांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. हे कार्य विद्यापीठ शिक्षणशास्त्र विभाग व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी करावे. शाळांनीही मूल्यसंस्कारासाठी वेळापत्रकात आठवडयाला एक स्वतंत्र तासिका राखून ठेवावी व त्यावेळी अभ्यासपूरक उपक्रम घ्यावेत.

५.७ सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी :

१) शास्त्र, गणित, इंग्रजी या विषयाप्रमाणेच इतिहास हा महत्वाचा विषय आहे हे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक इत्यादी घटकांना पटवून दिले पाहिजे. इतिहास विषयाबाबतचा उदासीनतेचा दृष्टिकोन बदलला पाहिजे.

२) शाळे समोवतालच्या समाजातून ऐतिहासिकदृष्टया महत्वाच्या वास्तु, वस्तू, पत्रे यांच्या नोंदी करणे आणि त्या वस्तू शाळेच्या संग्रही ठेवण्यासाठी मिळविणे यासाठी इतिहास अध्यापकांनी प्रयत्नशील रहावे. इतिहास अध्यापनात त्याचा चांगला उपयोग होईल.

३) इतिहास अध्यापकांना ऐतिहासिक पुस्तके, मासिके घेण्यासाठी अनुदान द्यावे.

४) इतिहास अध्यापकांनी इतिहास अध्यापनात पारंपारिक पध्दतींचा वापर हा दृष्टिकोन बदलून नव्या तंत्रांचा पध्दतींचा वापर करून अध्यापनात जीवंतपणा आणावा.

५) इतिहास विषयाचे महत्व लक्षात घेता तो विषय सामाजिक अध्ययन या गटात समाविष्ट न करता १०० गुणांचा स्वतंत्र विषय ठेवावा.

६) वेळापत्रकात शेवटी इतिहासाचे तास ठेऊ नयेत. वेळापत्रकात विषयाला योग्य स्थान असावे.

७) इतिहास विषय शिकविण्याची इच्छा नसलेल्या अध्यापकांकडे इतिहास विषय अध्यापनासाठी देऊ नये.

८) इतिहास अध्यापकांनी इतिहास विषयाच्या संघटनेचे सभासद व्हावे. विषय संघटनेच्यावतीने वारंवार एस्.आय्.ई. च्या विस्तार सेवा विभागाच्यावतीने कृतिसत्रे, परिसंवाद, चर्चासत्रे यांचे आयोजन करावे.

९) इतिहास विषयाबाबतची अभिरूची वाढविण्यासाठी मासिके, वृत्तपत्रातील उपयुक्त माहितीचे संकलन, चित्रांचे संग्रह व ऐतिहासिक वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यासाठी विद्यार्थ्यांचे सहकार्य घेता येईल.

१०) इतिहास अध्यापनात वारंवार उपयुक्त ठरणाऱ्या शैक्षणिक साहित्याची निर्मिती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून व कलाशिक्षकाच्या सहाय्याने इतिहास अध्यापकाने करावी.

११) इतिहास अध्यापकाने शाळेतील निवडक विद्यार्थ्यांचे इतिहास विषयाचे मंडळ तयार करावे. त्या मंडळाच्या सहाय्याने शाळेतील ऐतिहासिक कार्यक्रमांचे नियोजन करून कार्यक्रम पार पाडावेत.

१२) पदवी पातळीवर इतिहास विषय नसताना व इतिहास विशेष अध्यापन पध्दती नसतानाही इतिहास विषय शिकविण्यासाठी दिला जातो. या ठिकाणी व्यवस्थापकीय सोय पाहिली जाते. विषयाला गौण स्थान दिले जाते. हा इतिहास विषयाबाबतचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. या कामी इतिहास अध्यापकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. तालुक्यातील इतिहास अध्यापकांनी एकत्र येऊन, चर्चा करून विषयाचा व्यासंग वाढवून इतिहास विषयाबाबतचा दृष्टिकोन बदलता येईल.

५.८ पुढील संशोधनासाठी विषय :

प्रस्तुत प्रकरणात आतापर्यन्त निष्कर्ष व शिफारशींचा ऊहापोह केलेला आहे. प्रस्तुत संशोधन करीत असताना संशोधकाला अनेक समस्या जाणवल्या. मात्र संशोधन विषयाशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध नसल्याने संशोधकाने समस्येच्या मूळाशी जाऊन सखोलवर विचार केलेला नाही. मात्र त्या समस्यांवर संशोधन झाले तर ते प्रस्तुत संशोधनास पूरक ठरणार असल्याने संशोधकाने त्या समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश केला आहे.

१) इतिहासाच्या पाठ्यपुस्तकाची रचना विद्यार्थी स्वत: शिकतील अशारीतीने करावी. यासाठी विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास घटकवार कोणत्या कृती देता येतील हे पाहण्यासाठी संशोधन हाती घेता येईल.

२) ऐतिहासिक घटनांचे आकलन होण्यासाठी ऐतिहासिक संबोधांचे स्पष्टीकरण ही बाब महत्वाची आहे. म्हणून इयत्तावार पाठ्यपुस्तकातील प्रत्येक प्रकरणातील ऐतिहासिक संबोध व त्यांचे स्पष्टीकरण करण्याची पध्दती असा आराखडा तयार करणारी पुस्तिका तयार करण्यासाठी संशोधन हाती घेण्याची गरज आहे.

३) इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातील विषयांश आणि मूल्ये यांच्यातील संबंध (अन्वय) स्पष्टपणे इतिहास अध्यापकाला समजावा व ती मूल्ये रुजविण्यासाठी अध्यापकांकडून प्रयत्न व्हावेत यासाठी पाठ्यपुस्तकाची रचना मॉडेल्स ऑफ टिचिंग या पध्दतीनुसार कशी करता येईल याबाबत संशोधन हाती घेण्याची गरज आहे.

४) इतिहासाचे अध्यापन करणारा अध्यापक हा एकूण शिक्षण प्रक्रियेतील महत्वाचा घटक आहे. अध्यापनपध्दती, तंत्रे बदलली मात्र अध्यापकांची दृष्टीच बदलली नाही तो उदासीनच राहिला तर अध्यापन परिणामकारक

होणार नाही म्हणून इतिहास अध्यापकात कोणत्या क्षमता आहेत व कोणत्या गुणांची कमतरता आहे याचा शोध घेण्यासाठी दृष्टिकोन मापन कसोटया तयार करण्याची गरज आहे.

५) इतिहास विषयाचे अध्ययन व अध्यापन मनोरंजक व परिणाम-कारक होण्यासाठी दृकश्राव्य साधनांचा वापर कोणत्यावेळी व कौशल्याने कसा करता येईल याबाबतीत संशोधन हाती घेता येईल.

६) इयत्ता ९ वीच्या इतिहास अभ्यासक्रमातील काही प्रकरणे निवडून त्यांच्या अध्यापनासाठी एका गटाला अध्यापन करताना एक अध्यापन कार्यनीती वापरणे व त्याच प्रकरणांच्या अध्यापनासाठी दुसऱ्या गटाला दुसरी अध्यापन कार्यनीती वापरून दोहोत तुलना करून कोणत्या घटकांसाठी कोणत्या अध्यापन कार्यनीती जास्त उपयुक्त ठरतात याविषयी संशोधन करता येईल.

वरील समस्यांवर होणाऱ्या संशोधनातून निघालेले निष्कर्ष व शिफारशी इतिहासाचे अध्ययन-अध्यापन परिणामकारक होण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरतील.

## परिशिष्ट - अ

### प्रश्नावली ` अ ` विभाग

### अध्यापकांच्या व शाळेच्या सर्वसाधारण माहितीसंबंधीच्या प्रश्नावलीचे विश्लेषण

| अनु. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| १. | १ ते ४ | बंदिस्त | अध्यापकांची सर्वसाधारण माहिती जाणून घेणे. |
| २. | ५ ते ८ | बंदिस्त | इतिहास अध्यापकांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता जाणून घेणे. |
| ३. | ९ | बंदिस्त | इतिहास अध्यापकांचा अध्यापन अनुभव जाणून घेणे. |
| ४. | १० ते ११ | संमिश्र | सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबतची अध्यापकांची मते जाणून घेणे. |
| ५. | १२ ते १४ | संमिश्र | शालेय ग्रंथालयातील इतिहासविषयक सुविधा जाणून घेणे. |
| ६. | १५ | बंदिस्त | इतिहास अध्यापकांची इतिहासविषयक अभिरूची जाणून घेणे. |
| ७. | १६ ते १७ | संमिश्र | शाळेतील इतिहास मंदिराची उपलब्धता अजमावणे. |
| ८. | १८ | बंदिस्त | इतिहास अध्यापन करताना स्थानिक पातळीवर स्थळांना भेटी दिल्या जातात काय हे जाणून घेणे. |
| ९. | १९ ते २४ | संमिश्र | इतिहास विषयाला पोषक अशा अभ्यासपूरक उपक्रमाबाबतची स्थिती जाणून घेणे. |

## प्रश्नावली `ब` विभाग

इ. ९ वीच्या इतिहास अभ्यासक्रमाबाबतच्या व अध्यापनकार्याबाबतच्या प्रश्नांचे विश्लेषण

| अनु. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| १. | १ ते २ | संमिश्र | इ. ९ वीच्या इतिहासाच्या सर्वसामान्य उद्दिष्टांना इतिहास अध्यापकांनी महत्वांशानुसार दिलेला अनुक्रम जाणून घेणे. |
| २. | ३ ते ४ | संमिश्र | इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातून सर्वसामान्य उद्दिष्टांची पूर्ती होते काय ते जाणून घेणे. |
| ३. | ५ | बंदिस्त | अ) इयत्ता ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमात प्रकरणांचा केलेला समावेश योग्य वा अयोग्य हे जाणून घेणे. |
| | | मुक्त | ब) प्रकरणात इतिहास अध्यापकांनी सुचविलेल्या सुधारणा जाणून घेणे |
| ४. | ६ | बंदिस्त | अ) प्रकरणांमधून दिलेल्या विषयांशाची परिपूर्णता अजमावणे. |
| | | मुक्त | ब) विषयांशाच्या परिपूर्तीसाठीचे उपघटक जाणून घेणे. |
| ५. | ७ | संमिश्र | अभ्यासक्रमपूर्ती आणि निर्धारित तासिका यांच्या योग्यायोग्यतेविषयीची अध्यापकांची मते जाणून घेणे. |
| ६. | ८ | संमिश्र | इ.९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातील उपघटकांची मांडणी, उद्दिष्टे इत्यादीबाबतची स्थिती समजून घेणे. |

प्रश्नावली ` ब ` विभाग (पुढे चालू....)

| अनु. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| ७. | ९ | बंदिस्त | इतिहास अध्यापकांनी अध्यापन करीत असताना वापरलेल्या अध्यापन पध्दती जाणून घेणे. |
| ८. | १० | बंदिस्त | इतिहास अध्यापक अध्यापन कार्यनीती वापरतात काय हे जाणून घेणे. |
| ९. | ११ | बंदिस्त | इतिहास अध्यापनात वापरलेले दृकश्राव्य साहित्य जाणून घेणे. |
| १०. | १२ | बंदिस्त | इ. ९ वीच्या इतिहास अभ्यासक्रमाची काठिण्यपातळी जाणून घेणे. |
| ११. | १३ | संमिश्र | अध्यापकाला अध्यापन करावी लागणारी प्रकरणे व विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास देता येणारी प्रकरणे जाणून घेणे. |
| १२. | १४ ते १६ | संमिश्र | संबोध स्पष्टीकरणासाठी अध्यापक वापरीत असलेल्या पध्दती व शैक्षणिक साधनांची उपलब्धता जाणून घेणे. |
| १३. | १७ ते १८ | संमिश्र | इ. ९ वीच्या इतिहासाच्या पाठयपुस्तकात असलेल्या मूल्यांचा शोध घेणे. |